# प्रेस नोट दि.१३/१०/२०१८
# विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे
# ३०२,३४ मधिल आरोपी २४ तासांच्या आत अटक केलेबाबत...

विश्रांतवाडी पोलीस स्टेशन गु.र.क्र.३०७/२०१८ भादवि ३०२,३४ मधील मयत नामे अनिल दत्तात्रय धोत्रे रा. वडारवाडी विश्रांतवाडी यांचा दिनांक ०७/१०/२०१८ रोजी पहाटे अज्ञात इसमांनी कोणत्यातरी कारणांवरुन खुन केला होता. सकाळी ०७/०० वा. खुनाची माहिती मिळताच रात्रपाळी अधिकारी पोउनि चौगुले सदर ठिकाणी पोहचुन मयत बॉडी पोउनि बोरसे यांच्या ताब्यात देवुन मयताची पोस्टमार्टम होणेकामी ससुन हॉस्पीटल येथे रवाना केली. खुनाच्या अज्ञात आरोपींचा शोध घेण्याकरीता मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४ व सहा पोलीस आयुक्त खडकी विभाग यांच्या आदेशाने विश्रांतवाडी पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या टिम करुन पाहिजे आरोपी यांचा शोध घेण्याकामी रवाना केले. तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक चौगुले व त्यांच्या स्टाफने घटनास्थळ व आजुबाजुच्या परिसरातील सीसीटीव्ही चेक केले असता, त्यांना एक होंडा ॲमेज व दोन इसम संशयरीत्या घटनास्थळी वावरत असल्याने त्यांनी त्या वाहनाचा व त्या इसमांचा शोध सुरु केला. पोलीस उपनिरीक्षक चौगुले यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, कैलास स्मशान भुमी चव्हाणचाळ विश्रांतवाडी येथे एक इसम लपून बसलेला आहे सदर ठिकाणी गेले असता, पोलीसांना पाहुन तो इसम पळू लागलेने त्यास सोबतचे स्टाफ पोउनि खलाने व पोशि खळसोडे यांच्या मदतीने त्याचा पाठलाग करुन पकडले. त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव शफीक जयप्रकाश पांडे वय १९ वर्षे रा.स.नं.११३, मच्छीमार्केट मागे विश्रांतवाडी पुणे असे असलेचे सांगितले .त्यास विश्वासात घेऊन तपास केला असता.त्याने सांगितले की, आज पहाटे शेलार घाटावर झालेला खुन हा राहुल मासुळ आणि रहेमान उर्फ जाफर शेख याने केलेला आहे व होंडा ॲमेज गाडी मी चालवित होतो. खुन केल्यानंतर मला घरी सोडुन होंडा ॲमेज गाडी घेवुन कोठेतरी गेले आहेत. त्यांनतर गुन्ह्यात पाहिजे आरोपी राहुल मासुळ व जाफर शेख यांचा शोध घेत असता, पोलीस शिपाई किशोर दुशिंग यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, आरोपी रहेमान उर्फ जाफर शेख व राहुल मासुळ हे येरवडा स्मशानभुमी ट्रव्हल्स थांब्यावर येणार असल्याचे समजल्याने सदर ठिकाणी पोउनि चौगुले यांनी त्याच्या सोबतचे कर्मचारी यांच्या दोन टिम तयार करुन गुंजन चौक व चित्रा चौक भाजीमार्केट येरवडा येथे सापळा रचला. थोड्याच वेळात मिळालेल्या माहिती प्रमाणे सदर ठिकाणी आरोपी रहेमान उर्फ जाफर शेख हा रिक्षातुन खाली उतरताना दिसला, तो पोलीसांना पाहुन भाजीमंडई येरवडा बाजुस पळुन जाऊ लागला त्यावेळी चित्रा चौकातील स्टाफ यांना फोनद्वारे माहिती देत असताना त्याना आरोपी रहेमान उर्फ जाफर शेख हा समोरुन पळत येताना दिसला, त्यावेळी तेथील स्टाफने त्यास शिताफिने पकडुन ताब्यात घेतले. व आरोपी राहुल मासुळ बाबत चौकशी करता त्याने राहुल गुंजन चौकात मला भेटणार होता असे सांगितले. आम्ही परत गुंजन चौकात सापळा रचला असता, तो तेथे मिळुन आला नाही. सदरचा गुन्हा दाखल झालेपासुन २४ तासाच्या आत गुन्ह्यातील अज्ञात आरोपी यांना ताब्यात घेवुन अटक करण्यात आलेली असुन पाहिजे असलेला आरोपी राहुल मासुळ याला दिनांक ०९/१०/२०१८ रोजी १८/०० वा अटक करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई मा. सुनिल फुलारी पुर्व प्रादेशिक विभाग, मा. प्रकाश अक्कानवरु पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ४, मा. कल्याणराव विधाते सहा.पोलीस आयुक्त खडकी विभाग, मा. वपोनि संगीता पाटील व पोनि गुन्हे अशोक सायकर यांचे मार्गदर्शनाखाली सदरची उल्लेखनीय कामगिरी ही सहा. पोलीस निरीक्षक दरवडे, पोलीस उप-निरीक्षक अभिजित चौगुले पोलीस उप-निरीक्षक बोरसे व पोलीस कर्मचारी पोहवा प्रविण राजपुत, पोना विनायक रामाणे, पोना यशवंत किर्वे, पोना प्रविण भालचिम, पोशि रिहान पठाण, पोशि प्रफुल्ल मोरे, पोशि किशोर दुशिंग,पोशि अनिकेत भिंगारे पोना विनायक मुधोळकर, पोना वामन सावंत यांचेसह गुन्हा दाखल झालेपासुन २४ तासाच्या आत अज्ञात आरोपी यांचा शोध घेवुन उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.